शांति कभी भी ताकत से हासिल नहीं की जा सकती है। शांति समझदारी, ईमानदारी और मेहनत से किए गए काम के बाद मिलती है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २९ जानेवारी २०२५ | अंक५१ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२


राहुल मारोतीराव वाईकर

# पुण्यात ३१ तारखेला क्रिकेट सामना असल्याने सरकार सावध

# जीबीएस बाबत मुख्यमंत्र्यांची तातडीने कॅबिनेट

## सोलापूरात जीबीएसने घबराट

सोलापूर जिल्ह्यात ऋड्ड चे ५ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे भीतीचे वातावरण आहे. मात्र याबाबत नक्की हा आजार काय आहे त्याची माहिती सोलापूर मेडिकल कॉलेजचे डीन देतील असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी म्हटले आहे. ऋड्ड हा संसर्गजन्य रोग नाही त्यामुळे घाबरू नये. शरीरातील दूषित पेशी या शरीरातील अवयवांवर हल्ला करतात. गॅस्ट्रो, सर्दी आदी आजारा सारखा हा आजार आहे. यात पायात विकनेस येणे, पायातील चप्पल गळून पडणे, हातातील शक्ती जाणे, गिळायला त्रास होणे, दम लागणे, हाताला मुंग्या येणे आदी लक्षणे आहेत.



पुण्यातील जीबीएस आजाराने डोकेवर काढल्याने खळबळ उडाली आहे. पुण्यात या दुर्मिळ आजाराचे १०० हून अधिक रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे पुण्यात आणीबाणी जाहीर झाली आहे. हा आजार दुर्मिळ असला तर संसर्गजन्य आजार नाही. या आजाराचे रुग्ण आता बरे होत आहेत. या आजाराचा समावेश महात्मा फुले आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजनेत केल्याने त्याचा लाभ रुग्णाला मिळणार आहे. या जीबीएसने आजारासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला आहे. जीबीएस हा संसर्गजन्य रोग नसल्याने काही चिंता करण्याची गरज नाही असे आरोग्यराज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटले आहे. रविवारी पुण्यातील जीबीएस आजाराने त्रस्त झालेल्या रुग्णांची संख्या १११ झाली आहे. त्यातील ८० रुग्ण ५ किमीच्या परिघातील आहेत. त्यामुळे पुण्यातील ३५,००० घरांतील एकूण ९४,००० नागरिकांच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत. यासाठी पुण्यातील छखत राष्ट्रीय प्रयोगशाळेची मदत घेतली जात आहे. केवळ एका रुग्णाचा मृत्यू झाला असून तोही जीबीएसने मुळेच झाला याची अजून पुष्टी झालेली नाही.क्रिकेट सामना असल्याने काळजी पुण्याला ३१ जानेवारीला क्रिकेटचा सामना होणार आहे. त्यामुळे येथे मोठ्या संख्येने लोक येणार आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याकडे लक्ष देण्यात यावे असे आदेश सरकारने दिले आहे. हा विकार पिण्याचे पाणी दूषित असेल किंवा न शिजवलेले अन्न किंवा मांस खाल्ल्याने होतो. त्यामुळे बाहेरचे अन्न टाळा. पाणी उकळून प्या. तसेच या आजारामुळे घाबरून जाण्यासारखी स्थिती नाही. या आजाराचा समावेश महात्मा फुले जनारोग्य योजनेत केला आहे, त्यामुळे कमी उत्पन्न असणा-्या या योजनेतून उपचार मिळणे शक्य होणार आहे. तसेच शासकीय रुग्णालयात उपचारासाठी विशेष व्यवस्था निर्माण करावी असे आदेशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

## १४ लाखांचा वाळूसाठा जप्त; बीड ग्रामीण पोलिसांची कारवाई



महालक्ष्मी चौका जवळ छापा मारुन तब्बल १४ लाखांचा वाळूसाठा जप्त करण्यात आला. ही कारवाई बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सपोनि बाळराजे दराडे यांनी कर्मचाऱ्यांसह केली. सपोनि बाळराजे दराडे यांना गुप्त खबऱ्या कडून माहिती मिळाली की, धुळे-सोलापूर महामार्गालगत शिदोड शिवारात वाळूचा मोठा साठा आहे. यानंतर दराडे यांनी माहितीच्या ठिकाणी पाहणी केली असता येथे वाळूचे मोठे ढीगारे दिसून आले. याची बीडचे तहसीलदार शेळके यांना माहिती दिली. त्यांनी मंडळ अधिकारी आणि तलाठ्यास पाठवून दिले. यानंतर पंचनामा करुन हा १४ लाख किंमतीचा वाळूसाठा जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि बाळराजे दराडे, पोलीस हवालदार मस्के, मोराळे, जायभाय, जगताप, तांदळे, बडे, जाधव यांनी केली.

## विद्यार्थ्यांच्या आवाजाने गजबजला शाळेचा बालबाजार; २५ हजार रुपयांची झाली उलाढाल

जालना प्रतिनिधीः- जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पानेवाडी तालुका घनसावंगी येथे मंगळवार दिनांक. २८.०१.२०२५ रोजी बालबाजार (आनंदनगरीचे) आयोजन करण्यात आले होते.

मुलांचे व्यावहारिक ज्ञान वाढवण्यासाठी तसेच शिक्षणाबरोबरच आर्थिक व्यवहाराचे ज्ञान प्रत्यक्ष कृतीतून मिळावे त्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्साहात शेतीमधील भाजीपाला व स्वतः बनवलेले पदार्थ,वस्तू यांचे स्टॉल लावून त्यांची विक्री केली.सदर बालबाजारात इयत्ता- पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन विविध



प्रकारच्या २० ते २५ प्रकारच्या साहित्यांचे/ पदार्थांचे स्टॉल मांडून जवळपास २५ हजार रुपयांची उलाढाल केली. यामधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचा अनुभव घेता आला बालबाजारात सर्व प्रकारचा भाजीपाला, विविध फळे, समोसे, कचोरी,चहा, पाणीपुरी,धपाटे, गुलाबजामुन, शैक्षणिक साहित्य, खमंग पापड, चना उसळ, पोहे अशा अनेक प्रकारचे स्टॉल मांडून उत्तम प्रकारे वस्तूंची विक्री केली. त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांना हिशोब करताना गणितीय आकडेमोड करून पैशांचे व्यवस्थापन करता येत होते ..बाजारात आपल्या वस्तू विकण्यासाठी ग्राहकांना आकर्षित करत असताना ताजी भाजी, कोवळी भाजी गरम भजी, खमंग पापड,गोड पेरू घ्या, घ्या काका, घ्या दादा, घ्या मामा ,घ्या मावशी, अशा प्रकारच्या आवाजाने शालेय परिसर अक्षरशः दणाणून गेला होता..शाळेचे माजी विद्यार्थी, शिक्षण प्रेमी,पालक तसेच गावातील नागरिक यांनी खरेदीसाठी प्रचंड गर्दी केली होती. त्यांनी वस्तू व पदार्थ खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह व आनंद आणखी वाढवला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक नाविन्यपूर्ण अनुभव अनुभवण्यास मिळाला होता.. सदर आनंदनगरीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अंभोरे , शिक्षक प्रदिप मेहेत्रे , दिपक लोदवाल , सदाशिव वाघ , शरद ताठे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्यांनी उत्कृष्ट नियोजन व परिश्रम करून बालबाजार (आनंदनगरी) चे यशस्वी आयोजन केले.

## गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर




**पांडुरंग जाधव, अशोक जोशी, हनुमंत गावडे, सोपानराव निंबोरे, निसार शेख, विजयकुमार गाडेकर, अशोक भांडेकर, हमीदखान पठाण , शरद तळेकर, बापू खैरे, शबनम काझी, प्रतिक्षा मेश्राम, अशोक डोके, भंडारी, सानप, आदक, भोपळे यांच्यासह आदींचा समावेश**

पाटोदा (प्रतिनिधी)आष्टी मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष भीमराव धोंडे यांचे माता-पिता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या वर्षीच्या (एकविसावा) गंगाई बाबाजी महोत्सव २०२५ मधील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणा-या मान्यवरांना देण्यात येणा-या मगंगाई- बाबाजी आदर्श पुरस्कारांचीफ घोषणा नुकतीच करण्यात आल्याची माहिती या महोत्सवाचे संकल्पक माजीआमदार भीमराव धोंडे तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली. आष्टी येथील भगवान महाविद्यालयाद्वारा आयोजित हा महोत्सव ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे. गुरुवार दि ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता माजी मंत्री सुरेश नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आ भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. उद्घाटनानंतरयाच दिवशी महाविद्यालयीन वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात येतील. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलेले आहे. शनिवार दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, प्रसिद्ध सिनेअभिनेत्री कल्याणी चौधरी, मा. आ. भिमरावजी धोंडे, युवा नेते अजय धोंडे, तर यांच्या उपस्थितीत दिला जाणार आहे.

## प्रा.आत्माराम राजेगोरे यांना राज्यस्तरीय जनहित काव्य पुरस्कार प्रदान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : अर्धापूर तालुक्यातील शेलगांवचे रहिवासी तसेच वसमतच्या केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत इंग्रजी विषयाचे अध्यापक प्रा. आत्माराम राजेगोरे यांना अक्षरदान प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या गावपण हरवत चाललंय या कविता संग्रहासाठी राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे.) यांच्या वतीने दिला जाणारा जनहित काव्य पुरस्कार जाहीर झाला आहे.दि २७- जानेवारी रोजी ३ रे राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई व राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा ( दे ) यांच्या संयुक्त विद्यमाने सोनखेड ता.लोहा




येथे ३ रे राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलन संपन्न झाले.या साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य मा.प्रवीण प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते झाले.संमेलन अध्यक्षपदी परभणी येथील ज्येष्ठ कथाकार राजेंद्र गहाळ आणि सोनखेडचे उपसरपंच सुनिल मोरे हे स्वागताध्यक्ष होते. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा.श्रीधर नांदेडकर माजी संमेलनाध्यक्ष प्रा.महेश मोरे,कथाकार दिगंबर कदम, जेष्ठ साहित्यिक देविदास फुलारी आदी साहित्यिक मंडळी उपस्थित होती. राज्यस्तरीय जनहित काव्य पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा . महेश मोरे, अमृत तेलंग , प्रा. शिवाजी जोगदंड , श्रीनिवास मस्के , गोविंद कवळे , गणपत मारखणे , निळकंठ खुळे , मारोती बारसे ,. गणेश देलमडे , आदींनी पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा.आत्माराम राजेगोरे यांचे अभिनंदन केले .

# कोकण युवा सेवा संस्था कोकण सुंदरी कार्यक्रम संपन्न




कोकण युवा सेवा संस्था आयोजित विविध कार्यक्रम कोकण नगर भांडुप येथे आयोजित करण्यात आले होते. तसेच कोण होणार कोकण सुंदरी महा अंतिम फेरी २०२५ मिनी कोकण नगरीत म्हणजेच भांडुप मध्ये पार पडले. अतिशय उत्साहात आनंदात शिस्तप्रिय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या कार्यक्रमाची सुरुवात भांडुप चे प्रतिष्ठित व्यक्तिमत्व भांडुप पश्चिम पराग स्कूलचे सर्वेसर्वा बाळकृष्ण बने (शिक्षक) शिक्षण क्षेत्रातील नावाजलेले नाव यांसह सावली फाउंडेशन संस्थेचे संस्थापक /अध्यक्ष गणेश श्रीधर जाधव (सामाजिक कार्यकर्ता), रणजीत (नंदु) परब, भांडुप मधील नावाजलेले (पखवाज वादक),साक्षी सावंत (सुवर्ण संस्कार फाउंडेशन), हेमालता लक्ष्मण मेस्त्री (स्त्री शक्ती), श्रावणी मिलिंद पारकर(स्त्री शक्ती), सीतारामजी गावडे, राजेंद्र सातार्डेकर -राजू दादा इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यांचा सत्कार सन्मान करण्यात आला. गणेशजी जाधव, बणे शेठ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कोकण सुंदरी महाअंतिम फेरी २०२५ कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून -श्रिया चव्हाण, स्मिता निकेतन धुमाळ यांनी कार्यभार संभाळला. महाराष्ट्र नव निर्माणसेनेचे नेते शिरीषजी सावंत, वैष्णवी सरफरे, अनिलजी राजभोग, साक्षी नाईक, कविता राणे, संदीप निवळकर या मनसे पदाधिकारी आणि किरण प्रभु (सामाजिक कार्यकर्ते व कोकण युवा संस्थेचे सभासद) यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. तसेच कोकण महोत्सव संयोजिका आणि महिला उद्योजिका सुप्रिया धुरत या उपस्थित होत्या. अभिजित कोटकर संस्थापक/अध्यक्ष कोकण युवा सेवा संस्था यांनी कोकण युवा सेवा संस्थे बद्दल थोडक्यात माहिती देत संस्थे मार्फत केली जाणारी कामे, संस्था सुरू करण्यामागे नेमका उद्देश काय हे सांगितले. कोकणी बांधवांसाठी चालू केलेला हा मंच यास तीन वर्ष पूर्ण होत असून, संस्थेने जिव्हाळा नामक वृद्धाश्रम बदलापूर येथे सुरू केले असून या कार्यात कोकणवासीयांना तसेच उपस्थित मान्यवरांना सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. ध्यास समृद्ध कोकणचा हे ब्रीद वाक्य घेऊन कोकण स्पर्धकांचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. कोकण युवा सेवा संस्थे मार्फत उद्योजक लॉबीचे अनावरण करून, लॉबी मागील विचारधारणा या बाबत माहिती दिली. रुपेश कोलते उद्योजक लॉबी प्रमुख यांनी कोकण युवा




सेवा संस्थे बद्दल माहिती देताना उद्योजक लॉबी कशा प्रकारे काम करणार, त्यामागील उद्देश आणि व्यवसाय वृद्धी बाबत माहिती दिली. सोबत प्रत्येक असंघटित उद्योजकांना एकमेकांसोबत मिळून मिसळून एकत्र येऊन व्यवसाय वृद्धी करण्यासाठी उद्योजक लॉबी सारखा मंच कोकण युवा सेवा संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे. कु. निर्विक गणेश वागळे या बाल कलाकाराने छत्रपती शिवाजी महाराजांची मानवंदना साजरी केली. संस्कार संस्कार म्हणजे नक्की काय ते ह्या बालकलाकारात पहायला मिळाले.हौशी कलाकार ओढ परंपरेची ह्यांच्या मार्फत गण, गवळण, गोंधळ, जाखडी नृत्याच्या संगतीत पुन्हा एकदा कलाकारांद्वारे कोकण डोळ्यासमोर उभा केला गेला. पायात घुंगर, हातात रुमाल, संपूर्ण शरीराने घेतलेला ताल, सुबक नृत्य योजना सर्व काही डोळ्याचे पारणे फेडून टाकणारे होते.कोकण युवा सेवा संस्थेच्या वेब साईटचे अनावरण केले गेले. रक्तदान, क्रीडा, शिक्षण, महिला संरक्षण, गडकिल्ले संवर्धन, कोकणी बांधवांना एकत्र आणणे, व्यवसाय निर्मिती करून देणे, उद्योजक लॉबी उभारणे, पर्यावरण पूरक व्यवसायांना प्राधान्य देणे, अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करणे, विविध कार्यक्षेत्रात कोकण युवा सेवा संस्था सध्या कार्यरत आहे.धीरज कदम, मनिष जोशी, परेशजी,रातेशजी, दीपिका भोसले, अनघा खांडेकर, सचिन खांडेकर,साई फाउंडेशन, शाम गडेकर,मालवणी टेल्स चे निकेत हळवे साहित्य क्षेत्रातून अंकुश जोष्टे व विविध कार्यक्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.नवरंग कलामंच भांडुप यांनी फॉरेनची परबीण ह्या नाट्याचे सादरीकरण केले. कोकण युवा सेवा संस्था आयोजित कोकण सुंदरी २०२५ यामध्ये महिलांनी तसेच भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यापैकी फायनल मध्ये प्रीती वसंत मोरजकर, सायली सलील मांजरेकर, कस्तुरी तानाजी देसाई, नीता नितीन नवार , प्रियांजली पांडुरंग कुरुप, काव्या नितीन देसाई, अंतरा बागवे इत्यादी सौंदर्यवतींनी यांनी बाजी मारली. यापैकी कस्तुरी तानाजी देसाई या सौंदर्यवतीने कोकण सुंदरी २०२५ च्या ताजवर नाव कोरले. कोकण युवा सेवा संस्थेचा हा पहिलाच एवढा मोठा असा कार्यक्रम कोकण नगर भांडुप मध्ये अतिशय नियोजनबद्ध यशस्वीरित्या पार पडला संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष - कु.अभिजीत कोटकर, सचिव -अनिलजी गावडे खजिनदार-संजना संजय बेंद्रे व कार्यकारिणी सदस्य व कोकण युवा उद्योजक लॉबी प्रमुख - रुपेश कोलते साहेब यांनी उत्कृष्टरित्या पेलवली संपूर्ण वातावरण हे कोकणमय झाले होते. तसेच कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य महेंद्र घडशी मुंबई संघटक दिपक आमकर सोशल मीडिया प्रमुख अमर खेरटकर उरण तालुका संघटक परेश म्हात्रे सदस्य नथुराम मुकनाक,निखिल मुकनाक,मितेश गावडे,मोहित गावडे,अंकिता भोगले,रविंद्र हेगीष्टे,चंदन गावकर इत्यादी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य परिवारासहित उपस्थित होते.

# संपादकीय

## संकटाना धीराने तोंड द्यायला शिका..

सं - संपत नाही अशी शृंखला
क - कधी येतात चोरपावली, कधी अकस्मात
ट - टपलेली असतात जणुकाही

जीवन म्हणलं की सुखदुःखाची सावली आपल्या जीवनावर कायम पडत असते. आनंद दुःखाचे वातावरण कायम आपल्या आजूबाजूला असते. साधी गोष्ट घ्यायची म्हटलं तर जन्म झाला कोणाचा तर आनंदाने नाचतो पण मृत्यू झाला कोणाचा तर दुःख असते . हे जीवन चक्र चालूच असते. जो जन्माला आला तो जाणार आहे हे निश्चितच असते. किंबहुना जन्माला आला त्या दिवशी त्याची नोंद केलेली असते की हा या तारखेला जाईल म्हणून. हे आपल्या सामान्य माणसाला समजू शकत नाही. संकट जीवनात येतात पार होतात. करी संकटांचा डोंगरही कोसळतो. पण आपण डगमगून जायचे नाही. जसा एक डोंगर वारा,ऊन, पाऊस याला न डगमगता उभाच असतो त्याप्रमाणे जीवनात मनुष्याने खंबीर राहायला शिकायला हवे. जर मनुष्य खंबीर असेल तर पुढचे निर्णय घ्यायला तो पात्र ठरतो. त्याचे पुढचे जीवन सुखकर जाते. मनुष्य मनानं खंबीर असलाच पाहिजे. आलेल्या संकटांना धुडकावून लावता आले पाहिजे. एक वेळ असे आपल्याला म्हणावे लागते की देवा तू संकट दे पण सहन करण्याची ताकद दे. म्हणजे मग आपल्याला आपली ती ताकद जीवनात खंबीरता आणण्यासाठी उपयोगी पडते.

अगदी लहान लहान मुलं दहावी नापास झाले की आत्महत्या करतात. अपयश पचवायची ताकदच नसते या मुलांमध्ये. तर मुलांमध्ये लहानपणापासून अपयश पचवण्याचची ताकद आपणच आपल्या पाल्यांना द्यायला हवी. अनेक शेतकरी पावसाच्या नाराजी मुळे, भौगोलिक वातावरणामुळे त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते. याचे प्रमुख कारण म्हणजे संकटांना तोंड देण्याची ताकदच त्यांच्यामध्ये नसते. आपण या जगातून निघून गेल्यानंतर आपल्या कुटुंबांचे काय होईल हा विचार नक्की या लोकांनी करावा. आपल्या मुला बाळांचे कसे होईल?आपल्या आई वडिलांचे कसे होईल? या सर्वांना माझी गरज आहे हा विचार करावा. आणि मग निर्णय घ्यावेत. ते निर्णय घेताना खंबीरपणे निर्णय घ्यायला हवेत. मान्य आहे त्यांनी खूप खर्च केला आहे तो त्यांना मिळत नाही, पिकांचे नुकसान झाले, डोक्यावरील कर्ज फेडता येणार नाही,परंतु हा उपाय याच्यावर नाही. विचारपूर्वक सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. आपल्या घरादाराला आपली गरज आहे हे कायम लक्षात ठेवावे. आलेल्या संकटांना धीराने तोंड देण्यासाठी आपण प्राणायाम करावेत. मनः शांतीसाठी जुनी गाणी ऐकावीत. किंवा आपल्याला जे आवडतील ती गाणी ऐकावीत. आपला स्ट्रेस ज्याने जाईल असे वाटते अशा सर्व कृती आपण कराव्यात. रांगोळी घालावी, चित्रे काढावीत, आवडत्या सिरीयल बघाव्यात, आवडत्या व्यक्तीशी आपल्या मनातले बोलून मन रिकामे करावे. सहलीला जावे. निसर्गात रमावे. वाटले एकटेच बसावे तर एकटेच निवांत बसावे.अशा अनेक गोष्टी करता येतील की ज्याने आपण फ्रेश होऊन संकटांशी सामना करायला लागू.

तर मित्रांनो संकटं आली की त्याला धीराने तोंड द्यावे, डगमागून जाऊ नये इतकच मला सांगायचं आहे. मी स्वतः अनेक संकटांवर मात करून जीवन जगत आहे. तेही माझ्या चेह-यावर तुम्हाला कुठेही संकट रेषा पाहायला मिळणार नाही. पण त्या संकटातून मी अशीच बाजूला होते. घरातील सर्वांचा विचार करते. मन शांत करण्यासाठी निवांत गाणी जुनी ऐकते. चित्र काढते. यामुळे मी हा तुम्हाला सल्ला देत आहे. प्रत्येकाचे मत भिन्नता असू शकते. मी जे करते ते तुम्ही पण करावं असे काहीही मी सुचवत नाही. पण या लेखामुळे जर का आपल्या संकटांच्या वेळी काही कृती करून फरक पडला तर निश्चितच आपण तो करावा एकच सांगणे आहे.

शुभंभवतु!



वसुधा वैभव नाईक
धनकवडी जिल्हा पुणे
मो. नं. ९८२३५८२११६

# राज्यात पहिल्यांदाच महावितरणच्या ५ उपकेंद्रांना एकाच वेळी आयएसओचा बहुमान

छत्रपती संभाजीनगर : राज्यात पहिल्यांदाच महावितरणच्या 5 उपकेंद्रांना एकाच वेळी 'आयएसओ 9001:2015' मानांकनाचा बहुमान छत्रपती संभाजीनगर परिमंडलात मिळाला आहे. प्रजासत्ताक दिनाचे निमित्त साधून पाचही उपकेंद्रांचे अभियंता व यंत्रचालकांना एका खास सोहळ्यात आयएसओ प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणाबरोबरच त्यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या सूचना मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी दिल्या होत्या. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर शहर मंडलांतर्गत चिकलठाणा एमआयडीसीतील 33 केव्ही एसटीपीआय व बेडसे तसेच छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलांतर्गत गांधेली, शेंद्रा व हिवरा या उपकेंद्रांनी एकाच वेळी आयएसओ प्रमाणपत्राची तयारी सुरू केली. यामध्ये उपकेंद्रांची गुणवत्ता, कामाची गुणवत्ता, सर्व प्रकारच्या सुरक्षा उपायांची आणि उपकरणांची उपलब्धता, कागदपत्रे, वैद्यकीय सुविधा, सुशोभीकरण इत्यादी कामे करण्यात आली. त्यानंतर आयएसओ टीमने अलीकडेच या उपकेंद्रांना भेट दिली आणि मानकांनुसार सर्व अटी आणि शर्तींची तपासणी केल्यानंतर ही उपकेंद्रे आयएसओ प्रमाणपत्रासाठी पात्र ठरली. आयएसओ मिळविण्यासाठी मुख्य अभियंता कछोट यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंते, यंत्रचालक, जनमित्रांनी परिश्रम घेतले.

सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, महापारेषणचे माजी संचालक उत्तम झाल्टे, 'एमआयटीएल'चे महाव्यवस्थापक शंकर शिंदे, 'मसिआ'चे अध्यक्ष चेतन राऊत, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, 'आयएसओ'चे प्रधान लेखापरीक्षक एन.डी. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (26 जानेवारी) कार्यकारी अभियंता महेश पाटील, शैलेश कलंत्री, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत नाखले, विश्वनाथ लहाने, उपकार्यकारी अभियंता भाऊसाहेब साळुंके, सहायक अभियंता सतीश अधाने, भालचंद्र जाधव, मनीष मगर, योगेश चेंडके, यंत्रचालक व जनमित्रांना आयएसओ प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी उत्तम झाल्टे म्हणाले की, सतत 23 तास 59 मिनिटे वीजपुरवठा केला तरी कुणी कौतुक करत नाही, पण शेवटच्या मिनिटाभरासाठीही वीजपुरवठा खंडित झाला तर वीज कर्मचाऱ्यांना ग्राहकांचा रोष पत्करावा



लागतो. तथापि, अखंडित वीजपुरवठ्यासाठी महावितरणचे कर्मचारी करत असलेले कष्ट अनेकांना माहीत नसतात. ज्याअर्थी छत्रपती संभाजीनगरमध्ये कोट्यवधींची गुंतवणूक होत आहे, त्याअर्थी येथील विद्युत यंत्रणा चांगली आहे. टोयोटासारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्याही येथे येत आहेत म्हणजे येथील वीजपुरवठा खात्रीशीर, दर्जेदार व विश्वासार्ह आहे. महावितरणचे कर्मचारी, अभियंत्यांनी सातत्याने विद्युत क्षेत्रात येणाऱ्या नवनवीन संकल्पनांचा अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी ऊर्जा सहयोग संस्थेतर्फे आवश्यक ते प्रशिक्षण विनामोबदला देण्यास आम्ही तयार आहोत, असेही झाल्टे म्हणाले. शंकर शिंदे म्हणाले की, एकेकाळी भारनियमन होणाऱ्या या शहरात आज महावितरणच्या उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळणे ही अभिमानाची बाब आहे. रात्री-अपरात्री खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी रानावानात जाऊन कष्ट उपसतात. आयएसओ मानांकन हे त्या कष्टाला मिळालेली पावती आहे.

चेतन राऊत म्हणाले की, महावितरणचे नेहमीच उद्योजकांना सहकार्य लाभते. काही दिवसांपूर्वीच एसटीपीआय उपकेंद्रांतील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता व मुख्य अभियंता कछोट यांच्या तत्परतेने लवकरात लवकर बदलल्याने उद्योजकांचे मोठे नुकसान टळले. आयएसओ मानांकनाबद्दल महावितरणचे अभिनंदन करून यामागे सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता व मुख्य अभियंता कछोट यांची दूरदृष्टी आहे, असे राऊत म्हणाले. मानांकित उपकेंद्रांच्या वतीने प्रातिनिधीक मनोगत व्यक्त करताना शेंद्रा एमआयडीसीचे यंत्रचालक रमेश शिंदे यांनी आयएसओ मानांकन मिळवण्याची धडपड कथन केली. सर्व यंत्रचालक व जनमित्रांचे सहकार्य आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाशिवाय हे मानांकन मिळवणे शक्य झाले नसते, असे प्रांजळ मत त्यांनी व्यक्त केले.

सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता म्हणाले की, महावितरण ही सेवा देणारी कंपनी आहे. आज उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळाले ही कौतुकाची बाब आहे. पुढे आम्ही फिडर व ग्राहक सेवांनाही आयएसओ मानांकन मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत. इतर अभियंत्यांनीही याचा आदर्श घेऊन आपापली उपकेंद्रे आयएसओ प्रमाणित करून घ्यायला हवी. प्रादेशिक कार्यालयांतर्गत सर्व मंडल व परिमंडलांनी यासाठी प्रयत्न करायला हवेत, अशी अपेक्षा गुप्ता यावेळी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना मुख्य अभियंता कछोट म्हणाले की, भारतात पहिल्यांदा 1897 ला वीज आली. तेव्हापासून सव्वाशे वर्षांत वीज क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला आहे. वीज ही अन्न, वस्त्र, निवाऱ्याइतकीच महत्त्वाची मूलभूत गरज बनली आहे. विजेशिवाय जगण्याची कल्पना करता येऊ शकत नाही. अशी ही वीज ज्या उपकेंद्रांमार्फत ग्राहकांपर्यंत पोचवली जाते त्यांना आयएसओ मानांकन मिळवणे हा पहिला टप्पा आहे. पुढील काळात हा दर्जा टिकवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. सुरळीत आणि दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांची गुणवत्ता आणि कार्यक्षमता अतिशय महत्त्वाची आहे. त्यासाठी सतत देखरेख आणि उपाययोजना केल्या जात आहेत. एकाच वेळी पाच उपकेंद्रांना आयएसओ प्रमाणपत्र मिळाले ही अभिमानाची बाब आहे. वीजग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी केलेल्या तयारीची ही पावती आहे. आयएसओ मिळवण्यात पाचही उपकेंद्रांचे यंत्रचालक, जनमित्र, अभियंते, कंत्राटदार यांचा मोलाचा सहभाग आहे. तसेच काही वेळा वीजपुरवठा बंद ठेवून उपकेंद्रांतील कामे करण्यासाठी वीजग्राहकांचेही सहकार्य लाभले. ते सर्व अभिनंदनास पात्र आहेत. आयएसओ वगळून इतर उपकेंद्रांसाठीही स्वच्छ, सुंदर व सुरक्षित उपकेंद्र स्पर्धा घेत आहोत. सर्व वीज कर्मचाऱ्यांनी सुरक्षितपणे काम करायला हवे, असे आवाहनही कछोट यांनी केले.

याकामी महावितरणला सहकार्य करणारे ठेकेदार संतोष फुटाणे, दीप्तेश सपके, समाधान पाटील, मन्नान शेख, विजय घोगरे, सचिन सौंदळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास 'मसिआ'चे उपाध्यक्ष मनीष अग्रवाल, सुरेश खिल्लारे, मिलिंद कुलकर्णी, भगवान राऊत, 'ऊर्जा सहयोग'चे निवृत्ती जगताप, सुभाष मांगूळकर, एस.बी. कुलकर्णी, इंदर बोराडे, 'ऊर्जा मंच'चे हेमंत कपाडिया, सहायक विद्युत निरीक्षक प्रज्ञा कांबळे, जयश्री तरोळे, कार्यकारी अभियंता जयंत खिरकर, चांदेकर, सतीश खाकसे, प्रसाद महातोले, भूषण पहूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सूत्रसंचालन उल्हास देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शहर-2 विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश आंबेकर, सहायक अभियंता विजय काथार, प्रदीप निकम, गणेश पारीख, अक्षय अडबलवार, सुजाता जाधव यांच्यासह शहर-2 विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कॅप्शन : सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते आयएसओ प्रमाणपत्र स्वीकारताना कार्यकारी अभियंता महेश पाटील, सहायक अभियंता सतीश अधाने व त्यांचे सहकारी. यावेळी 'मसिआ'चे अध्यक्ष चेतन राऊत अधीक्षक अभियंता संदीप दरवडे, महापारेषणचे माजी संचालक उत्तम झाल्टे, 'आयएसओ'चे प्रधान लेखापरीक्षक एन.डी. देशमुख 'एमआयटीएल'चे महाव्यवस्थापक शंकर शिंदे, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे आदी.

# रोहिणी प्रकाशन, मुंबई प्रस्तुत शब्दमैफिल महाराष्ट्र दौरा २०२५ , म्हणजेच मराठी कवितांचा ओपन माईक कार्यक्रम,




रोहिणी प्रकाशन, मुंबई प्रस्तुत ङ्गशब्दमैफिलङ्ग महाराष्ट्र दौरा २०२५ , म्हणजेच मराठी कवितांचा ओपन माईक कार्यक्रम, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी पार पडला.कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागचे मुख्य दोन हेतू होते.पहिला हेतू म्हणजे महाराष्ट्रातील विविध भागांतील स्थानिक कलाकारांना त्याचं लिखाणकौशल्य सादर करण्याची संधी देत त्यांना ओळख मिळवण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणं आणि दुसरा मुख्य हेतू म्हणजे आपल्या मराठी भाषेला जो अभिजात भाषेचा दर्जा मिळालाय तो टिकवून ठेवण्यासाठी नवकवींच्या मराठी भाषेतल्या कविता रसिकांपर्यंत पोहचवणं.

ह्या शब्दमैफिलील कार्यक्रमाने मागील दोन वर्षांपासून मुंबई-पुणे शहरातील अनेक नवकवींना त्यांच्या कविता सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे आणि ह्या मिळालेल्या संधीच बहुतांश नवकवींनी सोनंही केलं. त्यामुळेच अशी संधी यापुढे महाराष्ट्रातील इतरत्र जिल्हातील कवी, कवयित्रींना ही मिळावी म्हणून हा महाराष्ट्र दौरा आयोजित केला आहे.

ह्या महाराष्ट्र दौरातलं पहिलं मुक्कामस्थान होत ङ्गलातूरङ्ग जिल्हा. लातूर जिल्हातील दयानंद कला महाविद्यालय सभागृहात ही शब्दमैफिल रंगली.

लातूर जिल्हात ङ्गपहिल्यांदाचङ्ग खास करून ङ्गनवकवींसाठीङ्ग असा कार्यक्रम आयोजित केल्यामुळे भरघोस प्रतिसाद मिळाला. ह्या कार्यक्रमाला रोहिणी प्रकाशनाच्या प्रकाशिका रोहिणी माया रामू वाघमारे उपस्थित होत्या तसेच,संपूर्ण टीम सूत्रसंचालक नरेश सोनावणे, कार्यक्रम नियोजिका प्रतिक्षा तिटकारे, नियोजक विकास कदम, निवास मौर्य आणि लातूर जिल्ह्यातील सहकारी सदस्य कवी स्वप्निल कांबळे व कवयित्री सई शिंदे उपस्थित होत्या.

तसेच सहभागी कवीं कवयित्री मध्ये

कवयित्री प्रेरणा परमेश्वर शिंदे, कवयित्री सई संजय शिंदे,कवी काकासाहेब अनिता जनार्धन कांबळे, कवयित्री निकिता बालाजी कांबळे, कवयित्री अस्मिता अशोक तिगोटे,

कवी विवेक कोंडीराम डोळसे,कवी अविनाश देविदास कांबळे, कवी प्रदीप नारायण कांबळे,कवी स्वप्नील सुवर्णा शिवाजी कांबळे, कवयित्री हर्षदा हनुमंत माने,कवी सुदर्शन सूर्यकांत जोशी, कवयित्री सागर रविंद्र पेठशिवणिकर,कवी महेश कैलास सूर्यवंशी,

कवी मारुती चंद्रकांत कांबळे,कवी विक्रांत व्यंकटराव शंके, कवयित्री प्रिती अनारूपे, कवयित्री अपर्णा योगेश कुलकर्णी, कवी गजानन लिंबराज कुलकर्णी,कवी पवन अशोक स्वामी, कवी ओंकार शिवाजी राजगुरू,कवी आदित्य बालाजी कांबळे, कवयित्री सौ.प्रिया माळी, कवयित्री मुकडे शिवाली धनंजय,कवी महादेव सोलगे, कवी आझाद अरूनराव कुलकर्णी, कवयित्री राजकन्या राजकुमार फावडे, कवी कल्याण राऊत,कवी राजेंद्र श्रीहरी कांबळे,कवी संस्कार गोपाल बाहेती, कवयित्री डॉ.अंजली तानपुरे,कवी कांबळे शुभम संभाजी, कवयित्री मोनिका महेशंकर स्वामी, कवी रोहन इंगळे,कवी कबीर रामकुमार रायवाडीकर

लातूरकर प्रेक्षक जे काव्यरसिक म्हणून या कार्यक्रमाला लाभले त्यांनीही शब्दमैफिलीला भरघोस प्रतिसाद दिला, भविष्यातही स्थानिक लेखक- कवीं कलाकारांसाठी नवनवीन उपक्रम राबवून पाठीशी उभं राहण्याचं आश्वासन देत रोहिणी प्रकाशनाद्वारे हा कार्यक्रम संपन्न झाला आणि महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यातील कार्यक्रम आयोजनाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

# कांदिवली येथील आर.जे.माखेचा हायस्कूलचा विविध कार्यक्रमासह प्रजासत्ताक दिन संपन्न

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कांदिवली पश्चिम येथील आर.जे.माखेचा हायस्कूलचा विविध कार्यक्रमासह प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा करण्यात आला.पाहुण्याचे स्वागत वाद्य, कवायतीच्या माध्यमातून करण्यात आले, यावेळी प्रिन्सिपॉल अवनी बयानी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले सलामी देऊन राष्ट्रगीत सादर झाले. शाळेतील मुला मुलींनी साक्षी,प्रणव, अश्विन, प्रिती आदींनी प्रजासत्ताक दिनाची माहिती आपल्या भाषणातून सांगून तेथील वातावरण देशभक्तीमय केले.दहावीच्या मुला मुलींनी सुंदर सादरीकरण करून नयनरम्य असे नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.लहान मुला मुलींनी वेशभूषा मध्ये सहभाग घेऊन आपल्या मधील कलेची झलक दाखवली,या मध्ये झाशीची राणी, सुभाषचंद्र बोस,मी. गांधी, भगतसिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्रप्रसाद, छत्रपती शिवाजी महाराज,अशा महान स्त्री व पुरुष यांच्या वेशभूषा धारण केल्या होत्या.मनपा आर दक्षिण विभाग यांनी भरवलेल्या विज्ञान प्रदर्शनात या शाळेने सहभाग घेऊन विशेष प्राविण्य मिळवले. शाळेतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणा-या मुला मुलींना, शिक्षिका यांना पाहुण्यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.प्रजासत्ताक दिनानिमित्त सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी प्रिन्सिपॉल अवनी बयानी,पीटी शिक्षक,नागरी संरक्षण दल प्रशासकीय अधिकारी सुधीर पवार, इव्हेंट इन्चार्ज कोमल आशर, निवेदिका वनिता केंडी, नृत्य दिग्दर्शिका कूपाळ पांचाळ,संगित शिक्षिका सोनाली सिंग, कर्मचारी अरविंद ठाकूर, यांच्या नियोजन बद्ध, शिस्त बध्द कार्यक्रमामुळे शाळेतील वातावरण देशभक्ती मय होऊन गेले होते.या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे साहित्यिक, गीतकार, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके, सायबर क्राईम सेल मुंबई पोलीस जयश्री तलवरे, ट्रस्ट चे अध्यक्ष सुरेश भाई पोपट, चेअरमन पियुषभाई धधा, सेक्रेटरी मितेश भाई , ट्रस्टी विनोद भाई सिंघाल आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी प्रमुख पाहुणे भारत कवितके आणि जयश्री तलवरे यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी प्रिन्सिपॉल अवनी बयानी यांनी सर्वांचे आभार मानले.



बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २९ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# महाराष्ट्र भूषण अभिनेत्याचा पद्मश्री पुरस्काराने गौरव



मुंबई प्रतिनिधी - आपल्या बहारदार अभिनयाने चित्रपटांचा पडदा, नाटकांचं व्यासपीठ, टीव्हीची स्क्रीन आणि बॉलिवूडच्या चंदेरी दुनियेला सुवर्णझळाळी बहाल करणा-या अशोक सराफ यांना यंदाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अतिशय मनापासून अभिनंदन! कधी विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या चेह-यावर खुदकनब हसू, कधी आशयघन अभिनयाने डोळ्यांत टचकनब पाणी आणणारे, तर कधी कसदार अभिनयाने प्रेक्षकांना अंतर्मुख करणारे अशी अशोक सराफ यांचं वर्णन केलं जातं. मराठी म्हणू नका, हिंदी म्हणून नका. अगदी भोजपुरी सिनेमांनाही अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाने अक्षरशः सजवलं. कधी नायक, कधी सहनायक तर कधी खलनायक अशा भूमिकांची तोरणं त्यांनी मनोरंजन विश्वावर बांधली. अशा या चौफेर मुशाफिरी करणा-या, महाराष्ट्र भूषण अभिनेत्याचा पद्मश्री पुरस्काराने गौरव करण्यात आलाय ही अत्यंत अभिमानास्पद आणि आनंददायी घटना आहे.

# ममोडीलिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन.

खर्डा ( प्रतिनिधी) येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळ व इतिहास विभागाच्या वतीने बुधवार दि. २९ रोजी एक दिवसीय मोडीलिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



याप्रसंगी मार्गदर्शन करण्याकरिता छत्रपती संभाजीनगर येथील पुरातत्व विभागाचे समन्वयक डॉ. कामाजी डक यांना आमंत्रित करण्यात आलेले आहे. तरी याप्रसंगी महाविद्यालय विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. महेश गोलेकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. विजयसिंह गोलेकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे यांनी यावेळी केले आहे.

# कोकण ग्राम विकास संस्थे तर्फे गुणवंताचा सन्मान

ठाणे, १८ जानेवारीः कोकण ग्राम विकास मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील अनेक गुणवंतांचा सन्मान करण्यासाठी स्वर्गीय यमुनाबाई बाजी राणे स्मृती पुरस्कार प्रदान सोहळा मालवणी महोत्सवाच्या २६व्या महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला. साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या गुणवंतांचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. सीताराम राणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य परिवहन मंत्री मा. श्री. प्रताप सरनाईक, मा. श्री. प्रवीण दरेकर, प्रा. डॉ. प्रकाश जंगले, आणि सौ. संगीता जंगले यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सुप्रसिद्ध अभिनेते श्री. अभिजीत चव्हाण, साहित्यिक श्री. प्रदीप राजे, अनिल कालेकर, आत्माराम गोसावी, गोपाळ गोसावी, चंद्रशेखर राणे, वंदेश पुरव, पूनम कर्णिक, सुज्योती वल्लाल, शांता चव्हाण, प्रमोद सूर्यवंशी, व्यंकट पाटील, संदेश लाळगे या गुणवंतांचा कोकण ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. सीताराम राणे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या महोत्सवाच्या निमित्ताने ऑल इंडिया पोएट्री असोसिएशन यांच्या सहकार्याने राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत २५० हून अधिक कवींनी सहभाग घेतला. प्रथम क्रमांक विजेती सौ. विजया थिगळे, द्वितीय क्रमांक विजेते श्री. उदय पळणीटकर, तर तृतीय क्रमांक विजेती सौ. नंदा कोकाटे यांनी आपली छाप सोडली. अनिकेत नाचणेकर, रुपाली महाजन, सुहासिनी पवार, आणि समिधा पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन त्यांचेही लेखन कौशल्य गौरवण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप अध्यक्ष श्री. सीताराम राणे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र वितरणाने झाला. या महोत्सवाला साहित्यप्रेमी आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

# शौर्यगाथा मराठवाडा मुक्तीसंग्रामाची या पुस्तकाचे शानदार विमोचन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रसिद्ध वक्ते,लेखक, शिवशंभू चरित्राचे अभ्यासक प्रा.संतोष देवराये लिखित शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची या पुस्तकाचे प्रकाशन ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभमुहर्तावर राज्याचे माजी शिक्षण मंत्री तथा शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी.पी.सावंत यांच्या अध्यक्षतेखाली,भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख डॉ.रावसाहेब शेंदारकर अॅड.उदयराव निंबाळकर,नरेंद्र चव्हाण सर,मधुकरराव देशमुख आदी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांनी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी,माजी गृहमंत्री श्रद्धेय डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन केले. सुप्रसिद्ध गायिका अनुपमा पाटील मॅडम यांनी सुमधुर आवाजात जिजाऊ वंदना सादर केली.

कार्यक्रमासाठी मराठा सेवा संघाचे शे.रा. पाटील शिवाजीराव खुडे, उद्धवराव सूर्यवंशी, नानाराव कल्याणकर, छावाचे प्रदेश संघटक तानाजीराव हुस्सेकर, प्राचार्य कमलाकर कणसे सतीश जाधव, माणिकराव पाटील देवराये, डॉ मोहन देवराये, युवराज पाटील शिंदे, साहेबराव नरवाडे यासह महात्मा फुले हायस्कूलमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात हुतात्मा आप्पासाहेब नाईक यांचे नातू श्री दत्तप्रकाश नाईक यांचा ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लेखक प्रा.संतोष देवराये यांनी प्रास्ताविकामधून मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचा थोडक्यात आढावा घेत पुस्तक लेखनाच्या पाठीमागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन मराठा सेवा संघाचे सचिव रमेश पाटील पवार यांनी केले. अनुपमा पाटील मॅडम यांच्या मधुर आवाजात गायलेल्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी साधला मुलांशी संवाद

(ता. २४ जुन्नर प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पुरस्कृत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे आणि शिवांजली साहित्यपीठ, शिवांजली ग्रामीण विकास प्रतिष्ठान, चाळकवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर आयोजित अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन घेण्यात आले. यावेळी येथील मुलांशी साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त कवी एकनाथ आव्हाड यांनी संवाद साधला. त्यास मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या कथा आणि कवितांना टाळ्यांनी दाद दिली. यावेळी आव्हाड यांनी मुलांना कवितेची सुरुवात कशी झाली ते सांगताना आपली पहिली कविता ङ्कसविता पटेकर-सतत गैरहजरम यासह वार्षिक शाळा तपासणीवरील कविता, ठमाकाकुंची कविता,



मनोरंजनातून बालसाहित्यम विषयावरील परिसंवादात मुलांशी संवाद साधताना एकनाथ आव्हाड.

आयं म्या रोज साळंत जाईन तसेच माझी वही या व अशा अनेक मुलांच्या भावविश्वाशी निगडीत असणा-या कविता सादर केल्या. तर कावळ्याने खाल्ल्या शेवया ही मनोरंजक कथा अशी सादर केली की अगदी लहानांनीच नव्हे तर मोठ्यांनीही स्तब्ध होऊन संमेलनस्थळी ती कथा ऐकली. कथेत सहभाग घेतला. यावेळी आव्हाड यांची जादू पूर्ण संमेलनात पसरली. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष सूर्यकांत सराफ, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, शिवांजली साहित्यपीठ जुन्नरचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव चाळक, जालिंदर डोंगरे, डॉ. कैलास दौंड, भास्कर बडे, डॉ. विनोद सिनकर, रमेश तांबे, संजय ऐलवाड, सचिन बेंडभर, बाळकृष्ण बाचल, उत्तम सदाकाळ, श्रीकांत चौगुले, अशोक सातपुते, राजेंद्र कुलकर्णी, अण्णासाहेब महाले, अलका बडे, सुभाष कोरडे, प्रशांत शेटे आणि चाळकवाडी संस्थेचे अध्यक्ष संदीप वाघोले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# नेरुळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उधानात उधान परिवारातर्फे प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

नवी मुंबई : (सुभाष हांडे देशमुख)

नवी मुंबई : नेरुळ येथील सेक्टर ९ मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात दररोज येऊन आपले शरीर स्वास्थ्य जपणा-या उद्यान परिवारातील ज्येष्ठांनी उद्यानाच्या प्रांगणात, दरवर्षीप्रमाणे भारताचा अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिन रविवार दिनांक २६ जानेवारी रोजी, सकाळच्या थंडगार वातावरणात मोठ्या उत्साही वातावरणात साजरा केला. वय वर्षे साठ ते वय वर्ष ८७ पर्यंत असलेल्या महिला व पुरुष ज्येष्ठांनी उस्फूर्तपणे मोठ्या संख्येने सहभागी होऊन भारत मातेला मानवंदना दिली.भारत मातेच्या प्रतिमेच्या पूजनाने सुरू झालेल्या या कार्यक्रमात प्रथम स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांचे स्मरण करुन त्यांना अभिवादन करुन राष्ट्र गीताने कार्यक्रमाची



सुरुवात झाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रमेश पै यांनी उत्कृष्टपणे करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत असतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्वपूर्ण योगदान तसेच राष्ट्राच्या घडणीत योगदान दिलेले इतर महनीय मान्यवर याविषयी सखोलपणे माहिती उपस्थितांशी संवाद साधताना दिली. प्रसंगी सुभाष हांडे देशमुख यांनी भारताचा स्वातंत्र्य दिन आणि आजचा प्रजासत्ताक दिन यांचे समाज जीवनातील विविध स्तरावरील महत्त्व विशद केले.सर्वश्री. नारायण लखमाणी, तानाजी जाधव, गुप्ता केशरवाणी, श्रीमती दुग्गल मॅडम यांनी देशभक्तीपर गीते गाऊन कार्यक्रम अधिक भावनात्मक केला तर श्री. महादेव जाधव यांनी माईक व्यवस्था तसेच संगीत याद्वारे देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रम बहारदार केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिवारातील सर्व ज्येष्ठांचा लाभलेला सक्रिय सहभाग याबरोबरच प्रामुख्याने सर्वश्री शशी जोशी, जयेश भावसार, विजय निंबाळकर, महादेव जाधव, किरण तामसे, जयवंत शेलार आदींनी खूप मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

# उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.



शिलवंत बहुद्देशिय विकास संस्था, भंडारा द्वारा संचालित उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र साकोली येथे प्रजासत्ताक दिनानिम्मित दिनांक २६ जानेवारी २०२५ ला ध्वजारोहण करण्यात आले.

सदर कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा. गंगाधरजी धुवाधपारे, प्रकल्प व्यवस्थापक मा. शिलवंत घोडेस्वार, प्रकल्प संचालिका मा. उषा घेडेस्वार, व व्यसनमुक्ती तील सहकारी, हेमेंद्र धकाते, जयश्री चिमणकर, रोहिणी मेश्राम, रोहित डहाट तसेच व्यसनमुक्ती केन्द्राचे संपूर्ण लाभार्थी उपस्थित होते.

सर्व मिळून तिरंग्याला सलामी देण्यात आली.

# क्रिकेट स्पर्धेसाठी जाहीर केलेले बक्षीस आयोजकांकडे आ. रोहित पवार यांच्या हस्ते सुपूर्त

## कार्यकर्त्यांनी वर्गणी गोळा करून शब्द खरा करून दाखवला..

( खर्डा प्रतिनिधी)

क्रिकेट स्पर्धेत बक्षीस जाहीर करणा-या राष्ट्रवादीच्या नेत्याचे दुर्दैवी अकाली निधन झाल्यानंतर त्या बक्षीसाची रक्कम गोळा करत आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत ती रक्कम आयोजकांना देऊन आपल्या नेत्याचा शब्द त्यांच्या मृत्यूनंतरही पुर्ण करुन दाखवण्याचे काम जामखेड तालुक्यातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केले. हा अतिशय भावस्पर्शी प्रसंग जामखेड तालुक्यातील दिघोळ येथे घडला.याबाबत अधिक माहिती अशी की, जामखेड तालुक्यातील दिघोळ येथे तेथील क्रिकेट रसिक तरुणांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा आमदार रोहितदादा पवार यांच्या नावाने मआमदार चषकफ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेसाठी राष्ट्रवादी



काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी मोठ्या रकमेची बक्षीसे जाहीर केली. स्पर्धेसाठी अहिल्यानगर सह आसपासच्या तीन चार जिल्ह्यातून क्रिकेट संघांनी सहभागी होण्यासाठी नोंदणी केली. स्पर्धेचे आयोजन अतिशय भव्य करण्यात आले. परंतू, स्पर्धा सुरु होण्यापूर्वी काही दिवस अगोदर या स्पर्धेत तिस-या क्रमांकावरील संघासाठी बक्षीस जाहीर केलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे जामखेड तालुका उपाध्यक्ष हनुमंत मुरुमकर पाटील यांचे अल्पशा आजाराने अकाली व दुर्दैवी निधन झाले.

नियोजित वेळेप्रमाणे सदरची स्पर्धा सुरु झाल्यानंतर काल राष्ट्रवादीचे कार्यकर्ते स्पर्धेच्या ठिकाणी आले व त्यांनी कै.हनुमंत पाटील यांनी जाहीर केलेली बक्षीसाची रक्कम गोळा करत आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत तसेच राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या हस्ते आयोजकांकडे सुपूर्द केली.

कै.हनुमंत पाटील यांनी जाहीर केलेल्या बक्षीसाचा शब्द पुर्ण करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपल्या दिवंगत नेत्याला जणू भावस्पर्शी आदरांजलीच वाहिली. या घटनेमुळे मैदानावर उपस्थित स्थानिक व बाहेरील जिल्ह्यातील संघांचे खेळाडू, उपस्थित प्रेक्षक, आयोजक व आमदार रोहित पवार यांच्या सह कार्यकर्ते हे सगळेच भावूक झाले.

यावेळी मंगेश आजबे,राष्ट्रवादी युवक चे तालुकाध्यक्ष प्रशांत राळेभात, अशोक गीते,भाऊसाहेब शिंदे,हनुमंत कोचाळे,हरिभाऊ गोलेकर इत्यादी उपस्थित होते.

# गांधी बालमंदिर मध्ये छात्र सेना दिनाचे दिमाखदार आयोजन!







राष्ट्रीय छात्र सेना दिनानिमित्त प्रीमियर शिक्षण मंडळाच्या गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक अनिल पांचाळ, पर्यवेक्षक रवींद्र खोंडे, एनसीसी ऑफिसर विश्वनाथ पांचाळ, स्काऊट गाईड व आरएसपी मार्गदर्शक अवधूत चव्हाण, प्रणिता रुईकर, अमोल जागले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक कमिशनर मुंबई पोलीस तसेच माजी एटीएस अधिकारी राजू ( आनंद) पाटील शाळेचे माजी मुख्याध्यापक दीपक हेदुलकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कोहिनूर समूह संचलित प्रिमीअर शिक्षण मंडळाच्या गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला येथे राष्ट्रीय छात्र सेना दिनाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते एनसीसी ध्वाजारोहणानंतर छात्र सेना, स्काऊट गाईड, आरएसपी आणि बँड पथकातील विद्यार्थ्यांनी दिमाखदार संचालन करुन एनसीसी ध्वजास मानवंदना दिली. भारतीय सैन्य दलाचे वाघा बॉर्डर,आटारी येथील प्रात्यक्षिके, स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांचे संकटकाळी स्व-संरक्षणात्मक आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षेचे उपाय, आरएसपी विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा प्रबोधनपर पथनाट्य सादरीकरण केले. लोकजागरण प्रतिष्ठानचे प्रशिक्षक मंगेश केणी, क्षितिज केणी व विराज तांडेल यांनी शिवकालीन तलवारबाजी, दांड पट्टा, लाठीकाठीची थरारक प्रात्यक्षिके कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. लेझिम, मानवी मनोरे, छात्र सेनेची तालबद्ध संचालने अशा भरगच्च कार्यक्रमास शाळेचे शिक्षक पालक,माजी विद्यार्थी यांनी जल्लोषपूर्ण प्रतिसाद दिला. तुमच्या मध्ये प्रचंड ऊर्जा असून तुम्ही ती देशाच्या सेवेत सत्कारणी लावा. लहानपणीच आपली आवड ओळखून त्यानुसार क्षेत्र निवडताना मार्गदर्शन घ्याङ्क असे आनंद पाटील यांनी मत व्यक्त केले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट छात्र सैनिक, क्रीडा सप्ताहातील विजेते यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शाळेच्या पर्यवेक्षक रवींद्र खोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले, शाळेचे कला शिक्षक रत्नकांत विचारे आणि ज्येष्ठ शिक्षिका अर्चना जाधव यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय छात्र सेना गीताने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २९ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


# सम्राट बुद्ध विहारात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन

## विविध उपक्रमातून उत्साहात साजरा



रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५रोजी ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त चक्रवर्ती सम्राट अशोक बौद्ध विहार काळे बोराटे नगर हडपसर याठिकाणी सकाळी ९/३०वाजता भारतीताई मोरे डी.वाय.एस.पी.लाचलुचपत प्रतिबंध विभाग पुणे यांच्या शुभहस्ते झेंडावंदन करण्यात आले . त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त कैलास थोरात यांनी संविधान याबद्दल माहिती सांगितली व याचा प्रसार, प्रचार महत्वाचा आहे हे सांगितले,अशोक सरवदे , गुणवंत वरठे,कवी भिमराव कांबळे ,अनुष्का सावळे,अपिता सुर्यवंशी,अशोक वाघमारे , तसेच डॉक्टर वणंजे इत्यादी वक्त्यांनी भाषणे केली लहान बालकांनी सुंदर भाषण केले.लहान मुलांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले.तसेच रवि डहाळे भारतीय युवा मोर्चा, शिक्षिका कवयित्री कांचन मून आदर्श साहित्य रत्न ,डाक्टर वणंजे उत्कृष्ट संघनायक, हनुमंत क्षिरसागर आदर्श साहित्य रत्न याबद्दल यांचा सत्कार करण्यात आला सदरप्रसंगी आदरणीय उत्तमराव धिवार, अंजू ताई वरठे उषा भरणे, संदीप सावळे, भास्कर गायकवाड,रवी कांबळे इत्यादी प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होते.लहान बालकांना खाऊ वाटप करण्यात आले

# संतोष देशमुखांचं कुटुंब जरांगे पाटलांच्या भेटीला, पत्नी अश्विनी देशमुख भावुक!

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली, मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर मनोज जरांगे पाटील अजूनही ठाम आहेत. त्यासाठी ते पुन्हा एकदा अंतरवाली सराटीमध्ये उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे. त्यांची प्रकृती खालावली आहे. दरम्यान आज संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी त्यांची भेट घेतली, संतोष देशमुख यांच्या आई, मुलगी आणि पत्नी यांनी म नोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी बोलताना संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख चांगल्याच भावुक झाल्या.

नेमकं काय म्हणाल्या अश्विनी देशमुख?

मी दादासाठी आजच पहिल्यांदा घराच्या बाहेर पडले, दुःखाचा डोंगर कोसळल्यावर काय



असतं हे जेव्हा कळलं तेव्हा मला दादाला पाहून वेदना होत आहेत. कुटुंबावर दुःख कोसळलं की त्या कुटुंबाची काय अवस्था होते याची जाणीव मला आहे. मला वाटतं अशी कुणावरही वेळ येऊ नये, लवकरात लवकर फडणवीस साहेबांनी दादांना न्याय द्यावा. शासन तर तसंच म्हणतं चालू आहे व्यवस्थित, पण इतके दिवस झाले अजूनही न्याय मिळालेला नाहीये. इतका उशिर का लागतोय? लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे, असं संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी म्हटलं आहे.

संतोष देशमुख यांच्या आईची प्रतिक्रिया

संतोष देशमुख यांच्या आई शारदबाई यांनी देखील आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, मुख्यमंत्र्यांनी पटकन आरक्षण द्यावं, मी जरांगे पाटलांना विनंती केली बसू नका, तुम्हीच बसले तर आम्हाला कोण आहे. मला न्याय पाहिजे, ज्यांनी संतोष देशमुखांना मारलं, त्या आरोपींना फाशी द्यावी. आम्हाला संरक्षण पाहिजे. लवकरात लवकर निर्णय झाला पाहिजे, नाहीतर आमाची सुद्धा सहनशक्ती संपली आहे. वेळेला पण काही मर्यादा असते. राज्य सरकारने यामध्ये लक्ष घालावं आणि त्यांना पटकन फाशी द्यावी, म्हणजे माझ्या जीवाला समाधान वाटेल असं संतोष देशमुख यांच्या आईने म्हटलं आहे.

## वैभवी देशमुख यांची प्रतिक्रिया

मुख्यमंत्र्यांकडे एकच मागणी आहे की, लवकरात लवकर आरक्षणाच्या प्रश्नाचं उत्तर द्यावं. दादांची तब्येत खालावत आहे. आम्हाला त्यांच्याकडे बघावसं वाटत नाही. माझ्या वडिलांना सुद्धा न्याय द्यावा, देवाकडे एकच मागणी आहे की दादाला बळ द्यावं. सरकारला मी एवढेच सांगते की दादाला काय झालं तर तुम्ही सर्वजण जबाबदार असाल. जरांगे पाटील यांच्या घरच्यांना सुद्धा दुःख वाटतं, जरांगे पाटील हे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या घरच्यांना देखील भावना आहेत, त्यांना वाटतं की दादांनी हे सर्व बंद करावं, असं वैभवी देशमुख यांनी म्हटलं आहे.

# लॉटरी विक्रेत्यांचा भव्य इशारा मेळावा प्रशासकीय फसव्या आकडेवारीचा पर्दाफाश

मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) महाराष्ट्र राज्य लॉटरी यबंदीसाठी प्रशासकीय स्तरावर तोट्याची जी आकडेवारी देण्यात येत आहे त्याचा पर्दाफाश महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुमित सातार्डेकर यांनी हजारो लॉटरी विक्रेत्यांसमोर केला मही आकडेवारी फसवी आहे. राज्य लॉटरी तोट्यात नव्हे तर फायद्यातच आहे! असा निष्कर्ष तपशीलातून मांडला त्यावरफ लॉटरी वाचवा विक्रेता जगवाफ्या घोषणांनी सभागृह दणाणून गेले. महाराष्ट्र राज्याची गौरवशाली परंपरा असलेली राज्य लॉटरी ही सरकारने बंद करण्याचा निर्णय घेतल्यास कुटुंबियांसह मंत्रालयावर लॉटरी विक्रेते थेट चाल करतील आणि आपल्या उदरनिर्वाहासाठी उग्र आंदोलने करतील




असा सज्जड इशारा लॉटरी विक्रेत्यांचे आक्रमक नेते श्री विलास सातार्डेकर यांनी शनिवारी हजारो विक्रेत्यांच्या साक्षीने दिला.दादर येथील वनमाळी हॉल मध्ये महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेतर्फे राज्य भरातील हजारो लॉटरी विक्रेत्यांची मइशारा बैठकफ आयोजित करण्यात आली होती त्यात विक्रेत्यांनी घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला मलॉटरी वाचवा;विक्रेता जगवा!अशी मागणी राज्य शासनाकडे या सभेत करण्यात आली.संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी आपल्या तडाखेबंद भाषणात स्पष्ट केले की शासन म्हणजे फायद्याचे गणित करणारी प्रॉफिट गेमिंग कंपनी नाही तरीही लॉटरी नफ्यात आहे पण काही द्रष्ट मंडळी ही दिल्लीकरांच्या स्वार्थी तालावर ही लॉटरी बंद करायला निघाले आहेत. नगण्य असलेला तोटा फुगवून उभा करण्यात आलाय आपल्या भाषणात अनेक मुद्द्यावर त्यांनी लॉटरी विक्रेत्यांच्या अस्तित्वासाठी तसेच ग्राहक, सरकार यांच्या भल्यासाठी लॉटरीचे महत्त्व अधोरेखित केले.संघटनेचे अध्यक्ष सुमित सातार्डेकर, सरचिटणीस राजेश बोरकर, मुंबई अध्यक्ष विनोद गाडेकर यांनीही विक्रेत्यांतर्फे सरकारकडे काही मागण्या केल्या मलॉटरीला अभय मिळाले तर आनंदोत्सव पण बंदी जाहीर झाल्यास मंत्रालय दणाणून सोडायचा ही इशाराफ यावेळी देण्यात आला लॉटरी बंद झाल्यास मटका,जुगार असे बेकायदा धंदे वाढतील आणि कायदा सुव्यवस्था परिस्थिती बिघडेल असे अध्यक्ष सुमित सातार्डेकर यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. विक्रेत्यांच्या या मेळाव्यात उद्योजक डॉ. नीलेश मानकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, लॉटरी बंदीचा निर्णय घेण्याऐवजी लॉटरीत सुधारणा सरकारने करावी कुण्या एका माजी खासदाराच्या तक्रारीवर ५५ वर्षाची परंपरा असणारी पारदर्शक लॉटरी सरकारने बंद करू नये नाहीतर शेकडो विक्रेते रस्त्यावर उतरतील!यावेळी व्यासपिठावर लॉटरी विक्रेत्यांचे नेते महेश कोळी तसेच संघटनेचे उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, आत्माराम नाटेकर, गुरुनाथ तिरपनकर, कार्याध्यक्ष राकेश उंबळकर, सदस्य रुचिता जाधव, अंबिका एजन्सीचे विलास निर्मळे, त्रिमूर्ती एजन्सीचे सत्यवान पेडणेकर,सिद्धी समर्थ एजन्सीचे ताराचंद सावंत, संजय पाल, किशोर धोत्रे, लॉटरी विक्रेता अशोक गुरव, सुरेखा कदम, उषाताई खंटागळे अंध विक्रेता संभाजी डोंगरे ईत्यादी उपस्थित होते अंध, अपंग, वयोवृद्ध, विधवा असलेले लॉटरी विक्रेते राज्यभरातून बैठकीसाठी उपस्थित झाले होते. सातार्डेकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# शब्दश्री विलास देवळेकर यांना राष्ट्रीय रत्न पुरस्काराने सन्मानित !!



नुकताच पुणे येथे सारसबाग जवळ विशाल सह्याद्री सभागृहात ङ्गप्रजासत्ताकङ्घ दिनाचे औचित्य साधून मस्वरकुल ट्रस्ट पुणेफ आयोजित, जीवनकला अकॅडमी प्रस्तुत भव्य वार्षिक कलागुण गौरव सम्मेलनात प्रमुख पाहुणे शब्दश्री विलास देवळेकर (मुंबई), डॉ. धीरजलाल कल्याणजी (मा नगरसेवक), डॉ सुभाष माने (प्रसिद्ध समाजसेवक), डॉ अजय न. अपामार्जने (राष्ट्रीय किर्तनकार) आणि श्रीमती सुषमा आपटे जोशी (माउथ ऑर्गन वादक) यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व भारतमातेच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

शब्दश्री विलास देवळेकर यांच्या सामाजिक कार्य तसेच साहित्य लिखाणात समाज प्रबोधनात्मक लेख व कवितेची दखल घेत. तसेच भारतातील पहिले अल्बम दिव्यांगानी गायलेल्या ङ्गतिमिरातूनी तेजाकडेङ्घ ह्या संगीतमय गीतांच्या अल्बम मध्ये, संगीतकार त्यागराज खाडिलकर यांनी संगीतबद्ध केलेल्या महा राष्ट्रध्वज आपुलाफ ह्या गीताचे गीतकार म्हणून विलास देवळेकर यांचा स्वरकुल ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ विणा त्यागराज खाडिलकर यांच्या हस्ते शैला गळ्यात घालून सन्मानपत्र व राष्ट्रीय रत्न स्मृती चिन्ह पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आणि आपल्या भाषणामध्ये मा. शब्दश्री विलास देवळेकर यांनी आपल्या स्टाईलमध्ये म्युझिकल इको साऊंड सिस्टीम मध्ये भाषण केले. उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रचंड प्रमाणात पसंती दिली. छोट्या विद्यार्थी गायकांनी आप आपल्या साहित्य वाजवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. आणि शेवटी, गीतकार विलास देवळेकर लिखित ङ्गहा राष्ट्रध्वज आपुलाङ्घ हे गीत वाजवून मसमारोपफ करण्यात आले.



# परिवर्तन वेलफेअर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.राजू वाघमारे यांचा वाढदिवस उत्साहात संपन्न

मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)परिवर्तन वेलफेअर फाऊंडेशन अंतर्गत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.राजू वाघमारे(शिवसेना शिंदे गटाचे सहप्रवक्ते/उपनेते)यांचा वाढदिवस नुकताच सदाकांत ढवण उद्यान,नायगाव,दादर पुर्व येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी मोनार्च डायमंडचे संस्थापक महेश उकार्डे,भाजपा म्हाडा सेल शिवडी विधानसभा क्षेत्राचे महामंत्री मंगेश कडुलकर तसेच जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन अभिष्टचिंतन केले व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.सहप्रवक्ते-उपनेते डॉ.राजू वाघमारे यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते.उपस्थितांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना पैठणी भेट देण्यात आली.याप्रसंगी डॉ. राजू वाघमारे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थितीती दर्शविली होती.

# उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली अंतर्गत ग्राम. पिपळगाव, लाखांदूर येथे व्यसनमुक्ती जनजागृती मार्गदर्शन



शिलवंत बहुउद्देशिय विकास संस्था, भंडारा द्वारा संचालित उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र साकोली अंतर्गत पिपळगाव ता. लाखांदूर येथे २६/०१/२०२५ ला प्रजासत्ताक दिनानिम्मित व्यसनमुक्ती जनजागृत्ती करण्यात आली. जनजागृती शिबिराचे आयोजन करून व्यसनमुक्त समाज निर्मिती कशी होईल या बाबत जनजागृती करण्यात आली. तसेच व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम, मृत्युदर प्रमाण, तरुण व्यसनात कसे गुरफटत चालेले याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी मुखतः पिपळगाव येथील सरपंचा मा. अस्मिता ताई लांडगे, व संपूर्ण ग्राम पंचायत सदस्य आणि व्यसनमुक्ती केन्द्राचे संपूर्ण कर्मचा-यांचे विशेष सहकार्य लाभले, व्यसनमुक्ती बद्दल माहिती देऊन त्यांना माहिती पत्र्क देण्यात आले.

या जनजागृत्ती कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा. गंगाधर धुवाधपारे, संस्थेचे उपाध्यक्ष मा. शिलवंत घोडेस्वार, प्रकल्प संचालिका सौ. उषा घोडेस्वार, जयश्री चिमणकर (नर्स), व संपूर्ण ग्रामवाशी भरगच्च संख्येने उपस्थित होते.

सौ.उषा घोडेस्वार यांनी व्यसनमुक्ती बाबत प्रबोधन करून व्यसनामुळे कुटुंब व समाजात प्रतिष्ठा कशी नाश पावत आहे हे सांगितले. व्यसनी लोकांना व्यसनमुक्ती केंद्राची गरज का आहे याचे महत्व पटवून दिले, काही ग्रामवासियांनी व्यसणामुळे होणारे सांगून आपले मनोगत व्यक्त केले. आरोग्य व व्यसनमुक्त जीवन असा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

सर्वांच्या सहकार्याने हा जनजागृत्ती कार्यक्रम अतिशय उत्कृष्ठ रित्या पार पाडण्यात आला.

# डॉ गणेश पुंडे साहित्य सारथी काव्यरत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी -जगदीप वनशिव

पुणे -येथील साहित्य सारथी कला मंच पुणे आयोजित कला महोत्सवात लातूर येथील ग्रामीण कवि डॉ गणेश पुंडे यांना या वर्षीचा साहित्य सारथी काव्यरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.




महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील धनेगाव या छोट्याशा खेडेगावातून आलेला हा तरुण अनेक अडचणीचा सामना करत साहित्य जगतात आपली ओळख निर्माण केली आहे....खडतर जीवन प्रवास करत गणेश पुंडे यांनी शिक्षण घेतले सरकारी नोकरीची क्षमता असणारा हा नवयुवक काही कारणाने मागे राहिला तरीही न डगमगता खाजगी नोकरी करत सामाजिक,साहित्यिक,औद्योगिक क्षेत्रात आपल्या नावाचा वेगळा ठसा निर्माण करत त्यांनी यश संपादन केले आहे. अपयशाने न खचता जीवनाच्या या शर्यतीत धावणा-या गणेश पुंडे यांच्या कार्याची दखल विविध संस्था संघटना यांनी घेतली आहे. विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.शून्य से शिखर तक अंतर्गत दिला जाणारा विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सन्मान, राष्ट्रीय गौरव रत्न पुरस्कार, राष्ट्रीय पद्मागौरव पुरस्कार, राष्ट्रीय साहित्य भूषण पुरस्कार, इंडियन आयकॉन पुरस्कार, साहित्य रत्न पुरस्कार, साहित्य सेवा पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार,आंतरराष्ट्रीय छंदोगामात्या पुरस्कार, सुजन भारत पुरस्कार,अशा अनेक पुरस्काराने सन्मानित गणेश पुंडे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सलग तीन वेळा सहभाग नोंदवला आहे. विविध चॅनेल्स रेडिओ ने त्याच्या काव्याची दखल घेतली आहे. विविध वर्तमान पत्रात तथा प्रतिनिधिक काव्यासंग्रहात त्यांच्या कविता, लेख प्रकाशित झालेले आहेत.भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्या नावाने पोस्टल तिकीट काढून अनोखा सन्मान केला आहे. जागतिक संसदेने गणेश पुंडे यांना जागतिक संसदेचे सदस्यत्व बहाल केले आहे. राजेश दिवटे लिखित झिरो ते हिरो या प्रेरणादायी ग्रंथात गणेश पुंडे यांचा जीवन परिचय प्रकाशित करण्यात आला आहे. एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला आहे यांच्या कार्याची दखल घेऊन सदर पुरस्कार देताना आम्हाला आनंद होत आहे असे मत साहित्य सारथी चे संस्थापक अध्यक्ष मा सुरेश धोत्रे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला उदघाटक म्हणुन ज्येष्ठ साहित्यिक शैलेंद्र भणगे सर,अध्यक्ष ज्येष्ठ गजलकार प्रा सतिश देवपूरकर प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचा युवा व्याख्याता मा सुनिल धनगर सर राष्ट्रपती पदक विजेते लोककवी सीताराम नरके प्रसिद्ध निवेदक रानकवी जगदीप वनशिव, राजेंद्र केंगार जितेन सोनावणे डॉ अह्फाज मुलाणी अध्यक्ष इंद्रायणी साहित्यपीठ आदी उपस्थित होते. साहित्य सारथी चे संस्थापक अध्यक्ष मा सुरेश धोत्रे अध्यक्ष डॉ प्रशांत पाटोळे मा दिनेश कांबळे गंगाधर डिगोळे यांनी डॉ गणेश पुंडे यांना सन्मानित केले आहे.सदर पुरस्कार सोहळा काव्यवाचन पुणे विश्रांतवाडी येथील डॉ नानासाहेब परुळेकर विद्यालयात संपन्न झाला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com